Savitribai Phule Pune University
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*मुळा एज्युकेशन सोसायटीचे,*

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय

## सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर.

सावित्रीबाई फुले पुणे विदयापिठाच्या एम.कॉम.पदवी करिता सादर करावयाचा

**प्रकल्प अहवाल**

शैक्षणिक वर्ष २०२०–२१

**प्रकल्पाचे नाव**

**श्री शनीसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे**

**संशोधक विदयार्थी**


कु. **कुऱ्हाट मनिषा पोपटराव**

एम. कॉम II


**मार्गदर्शक**


**प्रा. डॉ. श्री. दरंदले एस. आर.**

एम. कॉम. पी.एच.डी.

वणिज्य विभाग


कुऱ्हाट मनिषा पोपटराव

*मुळा एज्युकेशन सोसायटीचे,*

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय

NACC REACCREDITED "A" GRADE
I.D – PU/AN/ACS/031/1989
ISO 9001: 2008 CERTIFIED

सोनई, ता.नेवासा जि.अहमदनगर

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कुऱ्हाट मनिषा पोपटराव** एम कॉम भाग २ हिने २०२०–२१ सेमिस्टर चार मधील पेपर कमांक ४ प्रोजेक्ट वर्क या विषयाअंतर्गत**श्री शनीसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे**हा प्रकल्प अहवाल सादर केला आहे.

दिनांक / / २०२१

स्थळ सोनई

| सही | सही | सही |
|---|---|---|
| मार्गदर्शक | विभाग प्रमुख | समन्वयक |

कुऱ्हाट मनिषा पोपटराव

Phone/Fax : ( 02427) 231384

E-mail : soanicollege@yahoo.co.in Web Site : www.acssonaicollege.com

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते कि, कु. **कुऱ्हाट मनिषा पोपटराव** हिने सावित्रिबाई फुले पुणे विदयापिठाच्या संलग्नित विदयापिठाच्या पदव्युतर विभाग कला,वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सोनई येथील एम कॉम भाग २ ची विदयार्थीनी आहे. याने **श्री शनीसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे** या विषयावर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. प्रस्तुत प्रकल्प अहवाल माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकल्प अहवाल तिच्या स्वतःच्या कार्याची निष्पती असुन त्याचे संशोधन प्रकल्प अहवाल पुणे विदयापिठाच्या एम.कॉम. च्या अध्यादेशातील तरतुदींना अनुसरून आहे. असे मी प्रमाणित करतो.

**दिनांक** : /  /२०२१

**स्थळ : सोनई**

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. श्री. दरंदले एस. आर.**

**एम. कॉम. पी.एच.डी.**

**वणिज्य विभाग**

कुऱ्हाट मनिषा पोपटराव

# प्रतिज्ञापत्र

या संशोधन अहवालात समाविष्ठ करण्यात आलेले कार्य हे मी स्वतः केलेले आहे. त्यासाठी मला वेळोवेळी मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन मिळाले. मी संशोधनाचे कार्य संदर्भ खेरीज कोणाकडून कोणतीही मदत घेतलेली नाही. असे मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो. या संशोधनासाठी उपयोगात आणलेली संदर्भ पुस्तके विविध, प्रश्नावक्ता या सर्वांचा संदर्भ सूचीमध्ये निर्देश करण्यात आलेला आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**विदयार्थ्याचे नाव**

M.P. Kurhat

**कुऱ्हाट मनिषा पोपटराव**

**(एम. कॉम)**

कुऱ्हाट मनिषा पोपटराव

# ऋणनिर्देश

पुणे विदयापिठाच्या पदविका अभ्यास अंतर्गत ज्या वेगवेगळया विषयांचा समावेश होतो.विदयार्थ्यांना संशोधन पध्दतीची माहिती व्हावी म्हणुन निरनिराळया विषयांवर पाहणी करूण प्रकल्प अहवाल सादर करण्याचे काम विदयार्थ्याकडुन पदविका परीक्षा भाग २ मध्ये घेतले. हि संशोधन करण्याची किंवा अहवाल सादर करण्याची संधी मला पुणे विदयापिठाने उपलब्ध करूण दिलेली आहे.

या संशोधनासाठी मला जी काही आवश्यक असणारी पुस्तके, मासिके ग्रंथालयामधील सेवकांनी उपलब्ध करून दिली त्यांचा मी ऋणी आहे मला संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणुन लाभलेले **प्रा. डॉ. दरंदले एस. आर.** यांची मी ऋणी आहे. त्यांनी केलेल्या वेगवेगळया मार्गदर्शनामुळे मी हा माझा प्रकल्प पुर्ण करू शकलो. इतर माहिती पुरवणारे माझे मित्र व प्रकल्प टाईप व डिझाईन करण्यासाठी मदत करणारे माझे मित्र व मैत्रिणी यांचाही मी ऋणी आहे.

कुऱ्हाट मनिषा पोपटराव

M.P. Kurhat

**कुऱ्हाट मनिषा पोपटराव**

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय**

**सोनई,ता, नेवासा जि.अहमदनगर**

## अनुक्रमणिका


| अ. नं. | प्रकरणाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १ | **प्रस्तावना**<br>१.१ सहकाराची व्याख्या<br>१.२ सहकाराची तत्वे<br>१.३ सहकारी चळवळीची वाटचाल<br>१.४ सहकार क्षेत्राची सुरुवात<br>१.५ सहकाराची वैशिष्ट्ये<br>१.६ सहकाराचे महत्त्व<br>१.७ पतसंस्थेची नोंदणी<br>१.८ पतसंस्थेचे प्रकार | |
| २ | **संस्थेच्या संशोधनाचा उदेश व पध्दत**<br>२.१ संशोधनाचा विषय<br>२.२ संशोधनाचा उद्देश व व्याप्ती<br>२.३ अभ्यास विषयाची मूळ कल्पना व हेतू<br>२.४ अभ्यास विषयाची व्याप्ती<br>२.५ अभ्यास विषयाचा हेतू<br>२.६ अभ्यास विषयाची पध्दती<br>२.७ प्रकल्प अहवालाच्या पध्दती<br>२.८ प्रश्नावलीचे स्वरूप<br>२.९ अभ्यासातील मर्यादा<br>२.१० प्रकरण मांडणी | |
| ३ | **श्री. शनिसमर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. या संस्थेची माहिती**<br>३.१ पतसंस्थेची माहिती<br>३.२ पतसंस्थेची स्थापना<br>३.३ संचालक मंडळ<br>३.४ पतसंस्थेचे उद्दिष्टये<br>३.५ संस्थेची ठळक वैशिष्टये<br>३.६ संस्थेच्या सेवा व सुविधा | |

| | | |
|---|---|---|
| | ३.७ संस्थेचे व्यवस्थापन | |
| ४ | **संस्थेचे कामकाज व आर्थिक व्यवहार**<br>४.१ संस्थेची माहिती<br>४.२ एकूण ठेवीचा तपशील<br>४.३ ठेवीची रचना<br>मुदत ठेवीची स्थिती<br>बचत ठेवीची स्थिती<br>चालु ठेवीची स्थिती<br>४.५ कर्ज आणि ॲग्रीमेंट<br>४.६ अल्पकालीन कर्जे<br>दिर्घकालीन कर्जे<br>४.७ व्याजदर | |
| ५ | **सारांश निष्कर्ष व उपाययोजना**<br>५.१ सारांश<br>५.२ निष्कर्ष<br>५.३ संस्थेची प्रगती<br>५.४ सूचना व उपाययोजना<br>५.५ संदर्भ सुची<br>५.६ प्रश्नावली | |

## प्रकरण पहिले

**प्रस्तावना**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेती ही या भारत देशाची सर्वात मोठी संपत्ती आहे. आपल्या उपजिवीकेसाठी शेती करणे हा व्यवसाय देशामध्ये ७० टक्के लोकांचा आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास शेतीच्या विकासासाठी शेतीमध्ये गुंतवणुक होणे आवश्यक आहे. भारतासारख्या विकसनशील देशातील शेती हा केवळ उपजीविकेकरिता केली जात असल्याने भारतीय शेतकरी शेतीमध्ये गुंतवणुक करु शकत नाही. म्हणून शेतकऱ्यास अर्थपुरवठा करण्यासाठी जी संस्थात्मक यंत्रणा पुढे आली त्यामध्ये आपणास सहकारी संस्थेची व्याप्ती केवळ अर्थ पुरवण्यापुरतीच मर्यादीत राहिलेली नसून जीवनांच्या अनेक क्षेत्रात या चळवळीने मुळ धरलेले आहे. सहकार ही भारतीयांची जीवन पध्दत होवू पाहत आहे. भारतासारख्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेची या चळवळीशी अधिक निकोप वाढ होणे गरजेचे आहे.

८० टक्के लोक ग्रामीण भागात राहतात त्याप्रमाणे भारत हा कृषिप्रधान देश आहे. सहकार म्हणजे एकमेकांस मदत करणे होय. सहकाराची एकी किंवा ऐक्य असा अर्थ लावला जातो. सहकार ही एक संघटना म्हणून ओळखली जाते. ही एक कामाची पध्दत आहे.

**१.१ सहकाराची व्याख्या-**

सहकार म्हणजे सारख्या गरजा असणाऱ्या लोकांनी स्वखुशीने मानवप्राणी या नात्याने एकत्र येवून एकोप्याने समान भुमीकेतून आपल्या गरजा भागविण्याकरिता एकत्र येवून एकोप्याने काम करणे ही सह काराची व्यापक व्याख्या होवू शकेल.

१. एकोपा ही सहकारी पध्दतीचा आत्मा आहे.

२. सेवाधर्म हा सहकाराचा स्वभाव असून यात गरीबांना व दुर्बलांना मदत करणे अभिप्रेत आहे. या बाबतीत सहकारावर निष्ठा असणारे लोक भर देतात.

३. "एक सर्वाकरिता व एक सर्वाकरिता" हे सहकाराचे अधिष्ठ.ान आहे आणि यामुळे सहकार समतावादाच्या किती जवळ येवून पोहचते याची कल्पना येते.

४. शांततेने प्रगती घडवून आणणे हे सहकाराचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**सहकाराची तत्वे**

**प्राथमिक मुलतत्वे**

१. खुले व ऐच्छिक सभासदत्त्व

२. लोकशाही कारभार

३. भांडवलावर मर्यादित व्याज

४. सहकारी शिक्षण

**दुय्यम मुलतत्वे**

१. स्वावलंबन व सहकार्य

२. रोखीचा व्यवहार

३. बचत व काटकसर

**अ. प्राथमिक मुलतत्वे-**

**१. खुले व ऐच्छिक सभासदत्व -**

खुले व ऐच्छिक सभासदत्व हे सहकारी संस्थाचे प्रमुख तत्व आहे. सहकारी संस्थामध्ये सभासदत्त्व सर्वासाठी खुले आहे. यामध्ये जाती, धर्म, वंश, भेद, गरीब- श्रीमंत असा भेदभाव केला जात नाही.

**२. लोकशाही कारभार-**

सहकारी संस्थाचा कारभार लोकशाही तत्वावर चाललेला असतो, कारण या संस्था लोकशाही संघटन असतात. त्यामुळे त्यांचा कारभार व्यवसाय आणि व्यवहार बहुमताने निर्णय घेवून सभासदाचे नियमन आणि देखरेखीखाली चालविण्यात येतो.

**३. भांडवलावर मर्यादित व्याज-**

सहकारी चळवळीचा मुळ हेतू शेतकऱ्याची सावकारी पाशातून मुक्तता करणे हाच होता. सहकारी उभारण्यासाठी भांडवलाची गरज असते.

**४. सहकारी शिक्षण-**

प्रत्येक संस्थेने सभासदांच्या ज्ञानात भर टाकली पाहिजे सहकाराचा अर्थ आणि गुण याचा प्रचार करुन सहकारी शिक्षणात विकोप व न्याय व्यवहारांवर भर दिला जातो.

**ब. दुय्यम मुलतत्वे-**

**१. स्वावलंबन व सहकार्य-**

सहकारामध्ये स्वावलंबन विकसित होऊ शकते. प्रा.डॉ. चोपडे यांच्या मते परस्पर सहकार्यातून स्वावलंबन हे सहकार्याचे अत्यंत महत्त्वाचे तत्व आहे.

**२. रोखीचा व्यवहार-**

सहकारी संस्थामध्ये रोखीचा व्यवहार हे महत्त्वाचे तत्व मानले जाते. सहकारी संस्थामध्ये रोखीचा व्यवहार असतो.

**३. बचत व काटकसर -**

सहकारी संस्थेच्या सभासदांमध्ये बचतीची सवय निर्माण करणे शक्य होते. पतपुरवठा करणाऱ्या संस्थाना ही तत्वे लागु पडतात. कारण प्रत्येक सभासदास काटकसरीचे व बचतीचे महत्त्व पटल्याशिवाय सहकारी संस्थेजवळ पैसा जमा होणार नाही.

**१.३ सहकारी चळवळीची वाटचाल-**

भारतामध्ये १९०४ साली सहकाराची चळवळ सुरु झाली. मात्र भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खऱ्या सहकारी चळवळीचा विकास व विस्तार झाला.

इंग्लंडमधील सन १८४४ साली २८ विनकरांनी एकत्र येवून सहकारी संस्था स्थापन केली. ब्रिटेनमध्ये रॉसील येथे कामगार समाजसेवक व विचारवंत यांनी सहकारी तत्त्वावर संघटना स्थापना केली. जर्मनी आणि भारतातील परिस्थिमीमध्ये साम्य असल्याने फ्रेडरिक निकोलसने यांना भारत सरकारने जर्मनीमधील सहकारी चळवळीचा अभ्यास करण्यासाठी १८९२ मध्ये जर्मनीला पाठविले. १९०४ मध्य भारतातील सहकारी पतसंस्थेचा कायदा अस्तित्वात आला. समाजाचा आर्थिक व सामाजिक विचाराचा दृष्टिकोन समोर ठेवून १९२५ मध्ये भरलेल्या इंग्लिश को-ऑपरेटिव्ह कॉग्रेसने सहकारी तत्वांच्या आधारावर सहकारी लोक राज्य स्थापन करण्याचे उद्दिष्ट ठरविले. जर्मनी हा देश पतपुरवठा चळवळीचे माहेर घर म्हणून मानला जातो.

जर्मनीमध्ये १९व्या शतकाच्या मध्यापासून सहकारी चळवळीची सुरुवात झाली. १९२५ मुंबई प्रांताने सहकाराचा कायदा पास केला त्यानंतर १९३७ साली ओरीसा व १९४० साली पुर्ण बंगाल या प्रांतांनी सहकारासंबंधी कायदे केले १९५३ मध्ये आखील ग्रामीण पतपेढ्यांचा पाहणी अहवाल प्रसिध्द झाला. सहकारी वाहतूक संस्था सहकारी साखर कारखाने सुत गिरण्या इ. सहकारी संस्था आज सगळीकडे कार्यरत आहेत. प्रत्येक क्षेत्रात सहकारी चळवळीने पदार्पण केलेले आहे. तसेच तिने सामाजिक, आर्थिक तसेच सांस्कृतिक विकासात मोलाची कामगिरी बजावली आहे.

महाराष्ट्रात ३१ मार्च, २००० अखेर सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाची संख्या एकुण १,४६,६४१ असून सभासद संख्या सुमारे १ कोटी १४ लाख आहे. या संस्थाचे भांडवल ४.५६० कोटी असून ३५.३११ कोटी ठेवी ७०.५०१ कोटी खेळते भांडवल आहे. महाराष्ट्रात सर्व

सहकारी संस्थाचे स्वनिधी ७.०० कोटीच्या वर आहे. या संस्थाकडून १८.९३४ कोटी रु. कर्जवाटप झालेले आहे.

महाराष्ट्र सहकारी चळवळीचे शेती विकासामध्ये केलेले कार्य नेत्रदिपक आहे. शेतीसाठी लागणारा भांडवल पुरवठा या सहकारी संस्थाना मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिलेला आहे व त्या मार्फत शेतकऱ्यांच्या अडचणी दूर केलेल्या आहेत. शेती कर्जपुरवठ्याच्या बाबतीत महाराष्ट्र सहकारी बँक अग्रेसर आहे.

१८ व्या शतकात जगामध्ये बहुतांशी देशात भांडवलशाही अर्थव्यवस्थेची सुरुवात दिसून येत होती. त्या देशातील जनता भांडवलशाहीच्या दृष्ट परिणामास कंटाळली होती. या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेल्या देशांमध्ये गरीब व श्रीमंत मालक व कामगार यांच्यातील वाद टोकाला गेले होते. भांडवलशाहीच्या परिणामाबाबत १८व्या शतकाच्या मध्यास व शेवटी बरेचसे विचारमंथन झाले. बऱ्याच नवनवीन कल्पना उदयास आल्या. सहकार ही सुध्दा याच मंथनातून उदयास आलेली एक कल्पना होय.

**१.४ सहकार क्षेत्र-**

मागासलेली परिस्थिती वाढतच होती या सर्व गोष्टींमुळे सुधारणा होत गेली. सरकारने अशा संस्थांना वेगवेगळ्या सोयी उपलब्ध करुन दिल्या यातूनच खऱ्या अर्थाने सहकार क्षेत्राची सुरवात झाली.

**भारतातील सहकारी चळवळीचा जन्म-**

भारतातील सहकारी चळवळीचा जन्म एकजुटीतुन व आर्थिक अडचणी दूर करण्याच्या प्रयत्नातून झाला.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. असे म्हटले जाते की, भारतीय शेतकरी कर्जात जन्माला येतो, कर्जात वाढतो व कर्जाच्या सापळ्यात मरण पावतो, कारण त्याला सावकाराकडून जादा व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. अडचणी आल्यामुळे कर्जासाठी दिलेले तारण, मुदत व व्याज एवढे काही फेडणे शक्य नसल्याने सावकार त्यांची फसवणूक करतो.

१८७२ ते १९०० च्या दरम्यान भारत सरकारने शेतीला कर्ज पुरवण्यासाठी १८८४ साली शेती कर्ज कायदा मंजुर करण्यात आला.

सहकारी संस्था स्थापन करुन त्यांना पुरवठा विषयक काही अधिकार देण्यात यावे. या दृष्टीने १९०४ साली हिंदुस्तान शेतकरी पतपुरवठा कायदा मंजुर करण्यात आला.

**भारतातील पहिल्या सहकारी संघटना-**

जागतिक पातळीवर आज मोठया प्रमाणावर सहकारी तत्वावर अनेक संस्थाची निर्मिती झाली आहे. सहकारी भावनेतील सहकारी तत्वाच्या आधारावर महाराष्ट्रात अनेक सहकारी कारखाने स्थापन झाले त्यात महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना अहमदनगर जिल्हयातील प्रवरा (लोणी) येथे स्थापन झाला. त्याचे नाव अगोदर श्री. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना असे होते. नंतर त्यांच्या नावात बदल करण्यात आला.

अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सहकारी संघटनांची निर्मिती होऊन कामगांरांना रोजगार मिळाला. खुप मोठ्या प्रमाणावर फायदा सहकारी संस्थाचा झाला. महाराष्ट्र राज्यात अनेक ठिकाणी सरकारी संधटनांचे रुपांतर सहकारी संधटनात झाले आहे.

**नेवासा तालुक्यातील सहकारी चळवळ-**

महाराष्ट्रात क्षेत्रफळाच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा सर्वात मोठा म्हणून ओळखला जातो. अहमदनगर जिल्ह्यात सहकारी चळवळीच्या माध्यमातून नेवासा तालुका कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रचंड प्रमाणात गाजलेला आहे. नेवासा तालुक्यात सहकारी चळवळ १९७०-१९८० च्या काळात श्री. यशवंतराव गडाख पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात सर्वत्र सहकारी चळवळ सुरु झाली. नेवासा तालुक्यात सहकार उभा रहावा म्हणून त्यांनी तालुका दुग्ध सहकारी उत्पादक संधाचा समावेश केला होता. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील मुळा धरण नेवासा तालुक्यातच नव्हे तर अहमदनगर जिल्ह्यातील अनेक गावांना संजीवनी ठरला आहे.

नेवासा तालुक्यातील प्रत्येक खेडयात सहकारी दुग्ध उत्पादक संस्था स्थापन झालेल्या आहेत.

नेवासा तालुक्याचे भाग्यविधाते मा. खासदार श्री. यशवंतराव गडाख यांच्या प्रेरणेतून मुळा सहकारी साखर कारखान्याची स्थापना १९७० साली करण्यात आली.

## १.५ सहकाराची वैशिष्टये-

### १. ऐच्छिक संघटना-

आपले स्वहित व आपल्या बरोबर इतरांचेही हित जपण्याच्या हेतूने संघटित होतात. तसेच आपले हित-संबंध सहकारी संस्थामध्ये सुरक्षित नाही असे जर सभासदाला वाटले तर तो सभासद कधीही सभासदत्व सोडून जावू शकतो.

### २. लोकशाही तत्व-

सभासदांचे भांडवल त्यांचे धर्म, जात, पंत, वर्ण, यासारखे घटक विचारात न घेता प्रत्येकाला एकच मत देण्याचा अधिकार असतो. लोकशाहीमध्ये व्यक्तीला महत्व असते आणि सर्वांना सारखेच अधिकार असतात.

### ३. व्यवहार दृष्टी-

सहकारी संस्था व्यवहार करणारी संस्था आहे. कारण सहकारी संस्थेचे सभासद संस्थेला भांडवल उपलब्ध करुन देतात.

### ४. नफ्यापेक्षा सेवेला महत्त्व-

सहकारी संस्थेचा मुख्य हेतू नफा मिळवणे नसून ग्राहकांना सेवा उपलब्ध करुन देणे हा असतो.

### ५. समानतेचे तत्व-

सहकारी संस्थेत सर्व सभासद समान असतात. त्यांचे संबंध निश्चित झ ालेले असतात. समानतेच्या भावनेतून सभासद एकत्र येत असतात व कार्य करीत असतात.

### ६. नितीमुल्यावर भर-

सहकारी संस्थेतील सर्व कार्य व व्यवहार नितीमुल्यावर आधारित असतात. सहकारात नितीमुल्यावर अधिक भर असतो.

### १.६ सहकाराचे महत्त्व-

सहकारी चळवळीचे क्षेत्र व्यापक स्वरुपात आहे. सर्वच भागात चळवळीमध्ये राजकीय हस्तक्षेप दिसून येत आहे. स्वत:च्या फायद्यासाठी काही लोक वापर करताना दिसतात.

**सहकारी चळवळीचे महत्त्व-**

१. शेतीसारख्या तसेच लघुद्योगांना नवीन सवलती मिळतात.

२. बेरोजगारी कमी होते.

३. दरडोई उत्पन्नात वाढ होते.

४. सामाजिक फायदे मिळातात.

५. कामाचा योग्य मोबदला मिळतो.

६. शैक्षणिक फायदे मिळतात.

७. सभासदांना समान हक्क मिळतात.

८. मालक व मजुर यातील दरी कमी होते.

९. भांडवलशाहीतील नफाखोरीचे दोष दूर होतात.

१०. सभासदांचे मनोबल उंचावते.

### १.७ पतसंस्था नोंदणी-

कोणत्याही संस्थेच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे संस्थेची नोंदणी सहकारी कायद्यानुसार रितसर नोंदणी झाल्यानंतर कायदेशीर स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होत असते यासाठीच नोंदणी महत्त्वाची ठरते.

### १. नोंदणी पुर्व अवस्था-

या अवस्थेला प्रवर्तन अवस्था असेही म्हणता येईल.

गावामध्ये असलेल्या बँका ठेवी गोळा करणे व कर्ज वाटप करणे अशी परंपरागत कामे करीत असतात. बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर तर जवळजवळ सर्वच ठिकाणी

बँकिग सेवा जाऊन पोहचली. सावकाराकडून कर्ज काढून त्यांच्या मगरमिठित अडकण्यापेक्षा बँकेकडून कर्ज घेणे हा मार्ग उत्तम असल्याने लोकांना बँकेची सवय लागली मात्र बँकेच्या सेवेतील काही त्रुटी हळूहळू लोकांच्या लक्षात येऊ लागल्या.

धडाळ्याच्या काट्याप्रमाणे चालणारी सेवा कर्जासाठी लागणारी असंख्य कागदपत्रे एकाच वेळी सर्व कागपत्रांविषयीची माहिती न देणे हेलपाटे मारावयास लावणे इ. अडचणीमुळे बँका ह्या केवळ श्रीमंत लोकांना अधिकाधिक श्रीमंत करण्यासाठीच आहेत की काय असे वाटू लागले.

या ठिकाणी पतसंस्थेची बिजे रोवली गेली ज्यांना समाजात काहीतरी पत आहे अशा लोकांनी सहकारी संस्थेच्या माध्यमातून एकत्र येऊन गोळा केलेल्या ठेवीचा विनियोग गरजुंना कर्ज देण्यासाठी करावा आणि विलंबित सेवेतून सुटका व्हावी तसेच सावकाराकडेही वळावे लागू नये यातून पतसंस्थेचा उगम झाला.

सहकारी संस्थेची गरज व महत्त्व या गोष्टी सर्वसामान्यच आहेत. अनेक पतसंस्था आपल्या आजुबाजुला यशस्वीपणे कार्य करताना पाहुन साहजिकच अनेकांच्या मनात इच्छा निर्माण होते की,

आपण ही एका संस्थेची निर्मीती करु. पण त्यासाठी नेमके काय करावे हे अनेकांना माहित नसते. पतसंस्थेच्या स्थापनेच्या टप्प्यांची चर्चा पुढीलप्रमाणे-

**१. कल्पना सुचणे-**

सामाजिक दृष्टी व नेतृत्त्व हे गुण असणाऱ्या व्यक्तींना नेहमी समाजहिताच्या नवनवीन कल्पना सुचत असतात. त्यातील एक कल्पना पतसंस्थेची. त्या व्यक्तिला सर्व प्रथम ही कल्पना सुचते व जी व्यक्ती प्रत्यक्ष संस्था स्थापनेची जबाबदारी स्वीकारण्यास व नेतृत्व करण्यास स्वत:हुन तयार असते तिला प्रवर्तक असे म्हणतात.

**२. कार्यकर्त्यांची पहिला सभा-**

मुख्य प्रवर्तक कार्यकर्ते एकत्र करण्याचे काम करतो व सुचलेल्या कल्पनेला प्रत्यक्षात आणण्याचे दृष्टीने या कार्यकर्त्यांची एक अनौपचारिक सभा बोलवितो. ही सभा अत्यंत महत्त्वाची असते कारण या सभेतच पतसंस्थेचा जन्म निश्चित होत असतो.

**१.८ पतसंस्थेचे प्रकार-**

सहकार या शब्दाचा अर्थ  म्हणजेच एकमेकांना मदत करणे. सहकार क्षेत्राचा ना नफा ना तोटा पध्दतीने कार्य केले जाते व मिळणारा नफा आपापसात वाटून घेतला जातो.

अलिकडील काळात आढळून येणाऱ्या पतसंस्थंचे विविध प्रकार समजावून घेणे योग्य ठरते. शहरी व ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या व गरजा या भिन्न असल्याने त्यांच्या गरजेनुसार पतसंस्थेचे विविध प्रकार उदयास आले आहेत.

ग्रामीण विभाग व शहरी विभाग या दोन विभागावर पतसंस्थेचे विभाजन केले जाते. पतसंस्थेचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**पतसंस्थेचे प्रकार**

**ग्रामीण विभाग**

१) प्राथमिक पतसंस्था

२) बिगरशेती ग्रामीण पतसंस्था

३) कृषि पतपुरवठा संस्था

**शहरी विभाग**

.१) नागरी पतसंस्था

२)पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था

**प्रकरण दोन**

**संस्थेच्या संशोधनाचा उदेश व पध्दत**

**२.१ संशोधनाचा विषय -**

"श्री शनीसमर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, शनिशिंगणापूर या संस्थेचे आर्थिक व्यवहार व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचे विश्लेषण

**२.२ संशोधनाचा उद्देश व व्याप्ती-**

आशिया खंडातील भारत हा देश शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. कोणत्याही विकसनशील देशात शेतीला महत्त्वाचा कार्यभार साध्य करावा लागत असून भारत देश देखील अपवाद नाही. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्य साधारण असे महत्त्व आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान अर्थव्यवस्था आहे. भारतातील ६० टक्के शेतीवर अवलंबून आहेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी बँकाची भूमिका महत्त्वाची आहे. संशोधनासाठी मी नेवासा तालुक्यातील शनिशिंगणापूर येथील श्री शनीसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा विषय निवडला आहे.

**२.३ अभ्यास विषयाची व्याप्ती -**

ग्रामीण भागातील सहकारी पतसंस्थाचा व्याप थोड्याफार प्रमाणात वाढला आहे. तसेच वेळ व इतर विषयाचा अभ्यास करतांना व माहिती मिळण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा विचार करुन सन २०१३-२०१४ व २०१४-२०१६ या चालु आर्थिक वर्षात या संस्थेच्या आर्थिक व्यवहाराचे विश्लेषण करण्यात आले आहेत.

संस्थेतील कर्मचारी व्यवस्थापन तसेच राबविण्यात येणारे उपक्रम तसेच आर्थिक स्वरुपाच्या समस्या व्यवस्थापकीय स्वरुपाच्या कर्मचाऱ्यांबद्दल समस्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

या संस्थेच्या स्थापनेपासून इतिहास थोडक्यात पुर्ततेचा प्रयत्न केला आहे. तसेच संबंधित समस्येवर उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**२.४ अभ्यास विषयाची मूळ कल्पना व हेतू-**

संशोधनामुळे आपल्या ज्ञानात भर पडते. पुस्तकी ज्ञानाबरोबरच बाहेरच्या युगातील ज्ञान आवश्यक आहे. संशोधनामुळे अनेक प्रकराच्या अडचणी सोडवण्यासाठी मदत होते. समाजात व्यवसायामध्ये किती घडामोडी तसेच कशा प्रकारचे व्यवहार केले जातात यांची माहिती मिळते.

संशोधन विषयाची निवड ही कालावधीवर अवलंबून असल्यामुळे तसेच वार्षिक अहवाल व संस्थेच्या विविध नोंदी, परिपत्रके, नमुन्याचे फॉर्म व प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे माहिती मिळवली आहे.

प्रकल्प अहवालाच्या संशोधनाची पध्दती ही आर्थिक संशोधन पध्दत आहे. या पतसंस्थेतील सर्व सदस्यांशी संपर्क साधने सहज शक्य नसल्यामुळे मी या अभ्यासासाठी ५ सदस्यांची निवड करुन त्यांच्याशी संपर्क साधून माहिती गोळा केली आहे.

**२.५ अभ्यास विषयाचा उद्देश -**

१. संस्थेने पुरविलेल्या तसेच संस्थेमध्ये उपलब्ध सुविधांचा अभ्यास करणे.

२. संस्थेच्या ठेवी उभारणीचा अभ्यास करणे.

३. ग्राहकांच्या/सभासदांच्या बचतीचा अभ्यास करणे.

४. संस्थेच्या आर्थिक स्थितीचा तसेच संपत्तीक स्थितीचा
आकृतीच्या सहाय्याने अभ्यास करणे.

५. बचत व गुंतवणुकीचा अभ्यास करणे.

६. लहान वैयक्तिक तारणा विरहीत कर्ज वर्ग यांना वैयक्तिक
तारणावरही कर्ज देणे.

७. प्रशासकीय खर्चाचा अभ्यास करणे.

८.संस्थेचा उद्देश व उपक्रमांचा अभ्यास करणे.

**२.६ अभ्यास विषयाची पध्दती-**

**प्रकल्प अहवाल तयार करतांना वापरण्यात आलेल्या पध्दती-**

**अ. प्राथमिक माहिती.**

**ब. दुय्यम माहिती.**

**अ. प्राथमिक माहिती-**

१. संस्थेच्या संचालक व कर्मचाऱ्यांच्या मुलाखती

२. संस्थेला वेळोवेळी भेट देवून कार्यपध्दतीची माहिती

३. संस्थेच्या रेकॉर्डवरुन प्रशासकीय स्वरुपाची माहिती व आकडेवारी घेणे.

४. संस्थेच्या आर्थिक व्यवहारांतील चढ-उतार.

**ब. दुय्यम माहिती-**

१. श्री शनीसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. शनिशिंगणापूर या संस्थेची या कालावधीत संस्थेच्या अहवालातून कर्मचारी व्यवस्थापणाविषयी माहिती मिळवणे.

२. महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध व विषयाशी संलग्न पुस्तकाच्या आधारे वाचन करुन टिपणे काढली.

**२.७ प्रकल्प अहवालाचया पध्दती-**

**अभ्यास पध्दती**

**प्राथमिक पध्दती**

**१. प्रश्नावली**

**२. मुलाखत**

**३. निरीक्षण**

**४. सुची**

**दुय्यम पध्दती**

**१. प्रकाशित**

**२. पुस्तके**

**३. मासिके**

**१. उपप्रकाशित**

**२. शासकीय रेकॉर्ड**

**३. संशोधन अहवाल**

**२.८ प्रश्नवालीचे स्वरुप-**

**चेअरमन यांना विचारण्यात आलेले प्रश्न-**

१. या पतसंस्थेचा स्थापनेचा उद्देश कोणता ?

२. पतसंस्थेच्या स्थापनेतील अडचणी कोणत्या ?

३. पतसंस्थेच्या प्रगतीचे कारण ?

४. पतसंस्थेच्या विस्ताराबद्दल व भविष्याबद्दल थोडक्यात सांगा ?

**संचालक मंडहाला विचारण्यात आलेले प्रश्न -**

१. कार्यालयीन व्यवस्थापन कोणत्या प्रकारे केले जाते ?

२. कर्मचारी व्यवस्थापन कोणत्या प्रकारे केले जाते ?

३. संस्थेच्या ठेवी व कर्जाचे व्यवस्थापन ?

**कार्यालयीन कर्मचाऱ्यांना विचारण्यात आलेले प्रश्न-**

१. व्यवस्थापनाकडून कोणत्या प्रकारे वागणुक दिली जाते ?

२. संस्थेतील वातावरण खेळीमेळीचे असते का ?

३. संस्थेकडून मिळणाऱ्या मानधनावर तुम्ही खुष आहात का ?

**ग्राहकांना विचारण्यात आलेले प्रश्न-**

१. संस्थेकडून तुम्हाला चांगली सेवा मिळते का.

२. तुमचा पैसा सुरक्षित आहे असे तुम्हाला वाटते का.

३. इतर संस्थेच्या तुलनेत तुम्हाला या संस्थेबद्दल भविष्यात काय वाटते.

**२.९ अभ्यासातील मर्यादा-**

सदर प्रकल्प अहवाल पूर्ण करत असताना काही अडचणी/मर्यादा आल्या होत्या त्या खालीलप्रमाणे.

१. संस्थेच्या गोपनियतेच्या दृष्टिकोनातून काही माहिती संस्थेकडून मिळू शकली नाही.

२. सदर अहवाल तयार करताना संस्थेच्या केवळ २०१३-२०१४ व २०१५-२०१६ या वार्षिक आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला आहे.

३. अहवालामध्ये संस्थेचे व्यवस्थापन व आर्थिक स्थिती यांचाच अभ्यास केला आहे. संस्थेविषयी माहितीचा अभ्यास केला नाही.

कुंदन मानसी पाटराव

**२.१० प्रकरण मांडणी -**

१. प्रस्तावना

२. अभ्यास विषय

३. पतसंस्था संकल्पना व इतिहास

४. परिसर अभ्यास

५. निष्कर्ष आणि सुचना

६. संदर्भ ग्रंथाची सुची

कुऱ्हाट मनिषा पोपटराव

## प्रकरण तिसरे

## पतसंस्थेची माहिति

### ३.१ पतसंस्थेची निर्मीती

सहकारी संस्थामध्ये मोठ्या प्रमाणावर पतसंस्थेची निर्मिती करण्यात आली. त्यात नेवासा तालुक्यातील संस्थेचे संस्थापक कै. नामदेव लक्ष्मण कुऱ्हाट यांनी पतसंस्थेची निर्मीती केली.

शनिशिंगणापूर येथील नेवासा तालुक्यात रहिवासी असलेले कै. नामदेव कुऱ्हाट यांनी शनिदेवाच्या नावाच्या उल्लेखाने श्री शनिसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.  या संस्थेची स्थापणा केली.

नेवासा तालुक्यात शनिशिंगणापूर परिसरात श्री शनिसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. या संस्थेची स्थापना १९९९ साली करण्यात आली. या संस्थेचे भागभांडवल मोठ्या प्रमाणावर आहे. ठेवीचे प्रमाण कोटीमध्ये आहे कर्जाचे टक्केवारी प्रमाण हे इतरांच्या फायद्याच्या दृष्टीने आहे.

श्री शनिसमर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. ही नेवासा तालुक्यातील सहकारी संघटनांपैकी एक सहकारी पतसंस्था आहे. या पतसंस्थेच्या संस्थापक यांनी शनिशिंगणापूर येथे भाविकांसाठी भक्तनिवासाची स्थापना केली आहे.

आदर्श सहकारी संघटना म्हणून श्री. शनिसमर्थ बिगरशेती ग्रामीण पतसंस्था मर्या. या पतसंस्थेचे कामकाज चांगल्या पध्दतीने चालु आहे. शिंगणापूर परिसरात अनेक सहकारी संस्थाची निर्मीती

झाली आहे.

### इतर माहिती -

अहमदनगर जिल्हा हा सहकारी संघटनांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.

अहमदनगर जिल्ह्यामध्ये सर्वप्रथम सहकारी संघटनांची निर्मीती करण्यात आली. डॉ. श्री. बाबुराव बाबुजी तनपुरे व लोणी येथली डॉ.

श्री. विखे पाटील यांनी सर्वप्रथम सहकारी संघटनांची संकल्पना मांडली व त्यानुसार पहिला सहकारी साखर कारखान्याची निर्मीती डॉ. विखे पाटील घराण्यातील डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी केली.

अहमदनगर जिल्हा हा आदर्श जिल्हा. या आदर्श जिल्ह्यामध्ये अनेक सहकारी संघटनाची निर्मीती करुन मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण झाला. नेवासा तालुका हा संघटनांची पतसंस्थेची निर्मीती करण्यात यशस्वी झाला त्यात **श्री शनिसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. शनिशिंगणापूर** या संस्थेची निर्मिती करण्यात आली.

**वेगवेगळे व्यवसाय-**

औद्योगिक क्षेत्रामध्ये अहमदनगर जिल्हा मोठ्या प्रमाणावर अग्रेसर आहे. अनेक औद्योगिक संघटन उदा. एम. आय. डी. सी. या औद्योगिक संस्थाची निर्मिती करण्यात आली.

नेवासा तालुक्यात अनेक ठिकठिकाणी वेगवेगळया सहकारी संघटनांची निर्मिती करण्यात आली.

**सुविधा-**

नेवासा तालुक्यामध्ये सहकारी संघटनांची निर्मिती मोठ्याप्रमाणावर आहे. त्यामध्ये अनेक सोईसुविधा उपलब्ध आहे.

१. नेवासा तालुक्यामध्ये सरकारी दवाखाना आहे.

२. तालुक्यातील मुलामुलींना चांगल्या पध्दतीने शिक्षण घेता यावे आणि यासाठी अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालये उभारण्यात आले आहे.

३. वृध्दांसाठी तसेच अनाथ मुलामुलींसाठी आश्रम उभारण्यात आले असून त्याचा फायदा मुलांमुलीसाठी मोठ्या प्रमाणावर होतो.

४. तालुक्यातील वाहतुक साधने, दळणवळणाची सुविधा मोठ्याप्रमणात आहे.

५. सोनई या परिसरामध्ये अनेक शाळा, कॉलेजची स्थापना केली आहे. त्याचा फायदा गावातील मुला-मुलींसाठी होत आहे.

६. बँकींग सुविधा उपलब्ध आहेत.

## ३.२ संस्थेची स्थापना

- संस्थेची स्थापना - १५ डिसेंबर १९९९
- संस्थेची नोदंणी - ANR/NSA/RSR/CR/१०१५/९९
- सभासद संख्या - ४००
- संस्थेचे नाव - **श्री. शनिसमर्थ बिगरशेती ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या. शनिशिंगणापूर**

**कर्मचारी वर्ग**

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. फोके राजेंद्र श्रीमंत | मॅनेजर |
| २. | श्री. झेंडे दिपक बाबुराव | कॅशिअर |
| ३. | श्री. वैरागर कैलास योसेफ | सि. क्लार्क |
| ४. | श्री. पायघन गणेश आण्णासाहेब | ज्यु. क्लार्क |
| ५. | श्री. तनपुरे तुळशीदास | अकौन्टंट |

**संचालक मंडळ (सन २०१६-२०२१)**

| अ.नं. | संचालकाचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्री. कुऱ्हाट पोपटराव लक्ष्मण | चेअरमन |
| २. | श्री. दाणे बापुसाहेब बळीराम | व्हा. चेअनमन |
| ३. | श्री. डॉ.बानकर रावसाहेब सुखदेव | संचालक |
| ४. | श्री. बेल्हेकर नानासाहेब आसाराम | संचालक |
| ५. | श्री. कुऱ्हाट ज्ञानदेव बापुसाहेब | संचालक |
| ६. | श्री. अवारे बन्सी फकिरराव | संचालक |
| ७. | श्री. बेल्हेकर ज्ञानदेव आसाराम | संचालक |
| ८. | श्री. वैरागर संजय सिताराम | संचालक |
| ९. | श्री. भाकरे श्रीधर भानुदास | संचालक |
| १०. | सौ. शेटे शिवकन्या संतोष | संचालक |
| ११. | सौ. दरंदले सुवर्णा नामदेव | संचालक |

| | | |
|---|---|---|
| १२. | श्री. शेटे रंगनाथ किसन | तज्ञ संचालक |
| १३. | श्री. दरंदले किशोर आण्णासाहेब | तज्ञ संचालक |

**३.४ पतसंस्थेची उद्दिष्ट्ये-**

१. नेवासा तालुक्यातील व तसेच कारखाना परिसरातील लोकांमध्ये स्वावलंबन पैशाची काटकसर आणि सहकार्याची भावना वाढीस लावणे.

२. जनतेकडून ठेवी स्विकारुन त्यांचा विनियोग कर्ज देण्यात अथवा गुंतवणूक करण्यात येते.

३. लघु उद्योग आणि कुटीर उद्योगधंद्यांना अर्थपुरवठा आणि तंत्राज्ञान उपलब्ध करुन देणे.

४. स्वंयरोजगार उद्योग यांना स्वातंत्र्याचा उद्योग उभा करण्यास मदत करणे.

**३.५ संस्थेचे ठळक वैशिष्ट्ये-**

१. संपूर्ण संगणीकृत पतसंस्था.

२. सर्व व्यवहाराची गुप्तता व सुरक्षितता.

३. ग्राहकांना विनम्र व तत्पर सेवा.

४. सुज्ञ व कार्यक्षम संचालक मंडळ.

५. कर्जदारांना विमा संरक्षण.

६. ठेवीच्या विविध योजना व आर्थिक व्यवहार.

७. स्वंयभांडवलावर कर्जपुरवठा करणारी पतसंस्था.

८. सभासदांना कमीत-कमी व्याजदरात आवश्यकेनुसार कर्जपुरवठा करणे.

९. संस्थेच्या सभासदांसाठी निरनिराळे उपक्रम आयोजित करणे व व्यवस्थितपणे पार पाडणे.

१०. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सेंद्रीय शेती पिकविण्यासाठी विशेष मार्गदर्शन व सहाय्य.

**३.६ संस्थेच्या सेवा व सुविधा-**

संस्थेने सभासदांसाठी पुढील सेवा व सुविधा पुरविल्या आहेत.

१. संस्थेने सन २०१६ ते २०१८ या वर्षात कमी व्याज दराने कर्जपुरवठा केला आहे.

२. संस्थेचे सन २०१६ ते २०१७ या वर्षामध्ये सर्व सभासदांचा विमा उतरवला आहे.

३. सभासदांपैकी कोणाचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना विमा रक्कम प्राप्त होते.

४. आपल्या संस्थेच्या कार्यक्षेत्रात व परिसरातील सामान्य जनतेकडून ठेवी उभारून उपलब्ध भांडवलातून सभासदांना त्यांच्या विविध गरजा भागविण्यासाठी कर्जपुरवठा केला जातो.

५. संस्थेच्या व्यवहारामध्ये योग्य व्याजदरात कर्ज देणे.

**३.७ संस्थेचे व्यवस्थापन-**

संस्थेची प्रगती ही संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयांवर अवलंबुन असते. व्यवस्थापनाचे महत्त्वाचे कार्य संचालक मंडळ पार पाडीत असतात. त्यानुसार चेअरमन व व्यवस्थापक हे निर्णय घेत असतात.

पतसंस्थेच्या व्यवस्थापनाचे कार्य संस्थेचे चेअरमन व व्यवस्थापक बघतात. संस्थेच्या प्रगतीसाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. सभासदाच्या सोयीसाठी व विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात. ग्राहकांना जलद गतीने सेवा मिळाली हे योग्य ठेवले जाते. नियोजन व व्यवस्थापन अधिकारी वर्गाकडून केले जाते.

संस्थेसाठी विविध मार्गांनी व निरनिराळ्या योजना राबवून ठेवी गोळा केल्या जातात. ठेवीमध्ये वाढ करून योग्य ते कर्ज वाटप केजे जातात. संस्थेच्या प्रगतीसाठी मॅनेजर व चेअरमन नेहमी कार्यरत असतात. संस्थेचे व्यवहार सुरळीत पार पाडून सतत असलेल्या ऑडीट वर्ग कायम ठेवण्याचे ध्येय संचालक मंडळ करते.

## प्रकरण चौथे

## संस्थेचे कामकाज व आर्थिक व्यवहार

### ४.१ संस्थेची माहिती-

**प्रस्तावना -**

संस्थेच्या चालु आर्थिक वर्षामध्ये झालेली सभासद वाढ यांचे विश्लेषण तसेच ठेवीची माहिती कर्जे, राखीव निधी, भांडवलात होणारी वाढ याचे विश्लेषण सविस्तरपणे तक्त्यात दिलेले आहे ते खालीलप्रमाणे-

**तक्ता क्रं.- १**

**संस्थेची माहिती तक्ता**

| अ.क्र. | तपशिल | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ |
|---|---|---|---|
| १ | सभासद | ४०१ | ४०० |
| २ | वसुल भागभांडवल | १७,२०,५०० | १८,३९,३०० |
| ३ | खेळते भांडवल | ११,२६,२७,१८३ | ११,९२,०२,५७० |
| ४ | ठेवी | ८,४७,९३,४८३ | ८,७७,३८,२६० |
| ५ | दिलेली कर्जे | ५,१६,७६,६४७ | ४,८७,२७,९९३ |
| ६ | गुंतवणूक | ५६,८५,२४० | ६,५५,६८,५१६ |
|  | राखीव निधी | ३४,६४,९०७ | ३९,४९,४८६ |
| ८ | इतर निधी | १,३१,१५,३९७ | १,४८,५९,४२१ |
| ९ | एकुण उत्पन्न | १,२७,१७,९७५ | १,४६,२१,७७१ |
| ० | एकुण खर्च | १,०८,०९,४२० | १,१५,७२,०१२ |
| ११ | नफा/तोटा | १९,०८,५४४ | ३०,४९,७५८ |

**निष्कर्ष -**

१. संस्थेचे सन २०१५ च्या तुलनेत सन २०१६ मध्ये सभासद संस्थेमध्ये वाढ झालेली आहे.

२. संस्थेचे सन २०१६ च्या तुलनेत सन २०१७ मध्ये सभासद संस्थेमध्ये वाढ झालेली आहे.

३. संस्थेचे सन २०१७ च्या तुलनेत सन २०१८ मध्ये सभासद संस्थेमध्ये वाढ झालेली आहे.

४. संस्थेचे सभासदांना वाटप केलेले कर्जे हे सन २०१५ च्या तुलनेत जास्त प्रमाणात आहे.

५. संस्थेचे राखीव निधी ही सन २०१५ च्या तुलनेत सन २०१७ वाढलेली आहे.

६. नफ्याचा विचार करता नफा सतत वाढत गेलेला आहे.

कुऱ्हाट मनिषा पोपटराव

## ४.२ एकूण ठेवीचां तपशील-


**तक्ता क्रं-२**

| अ.नं. | तपशिल | ३१/०३/२०१७ | ३१/०३/२०१८ |
|---|---|---|---|
| १. | दैनिक मंगल ठेव | १,२६,७५,४२३ | १,६६,७८,७१३ |
| २. | सेव्हिंग्ज ठेव | १९,९७,७८६ | १७,६४,००८ |
| ३. | अल्पमुदत ठेव | १,१६,८६,८४९ | ६६,०६,६७४ |
| ४. | मुदत ठेव | ५,४०,८८,८९० | ५,८०,३०,८३० |
| ५. | दाम दुप्पट ठेव | ४२,९८,०३५ | ४६,१६,०३५ |
| ६. | कन्यादान ठेव | ४६,५०० | ४१,००० |

(संदर्भ - वार्षिक अहवाल)

**आलेख क्रं. ४.२**

**एकूण ठेवींचा तपशील -**



**निष्कर्ष-**

वरील आकृतीनुसार-

१. संस्थेची एकूण सभासदांची ठेवी या सन २०१७ च्या तुलनेत २९,४३,७७७ रु.वाढ ाली.

२. संस्थेची ठेव ही सन २०१७ च्या तुलनेत २०१८ मध्ये जास्त आहे.

कुऱ्हाट मनिषा पोपटराव

**४.३ ठेवीची रचना -**

**४.४ मुदत ठेवीची स्थिती -**


**४.५ बचत ठेवीची स्थिती -**

**तक्ता क्रं.- ३**

**ठेवीची रचना**

| वर्ष | मुदत ठेव | बचत ठेव | चालु ठेव | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०१६ - १७ | ५,४०,८८,८९० | १९,९७,७८६ | १,२६,७५,४२३ | ६,८७,६२,०९९ |
| २०१७ - १८ | ५,८०,३०,८३० | १७,६४,००८ | १,६६,७८,७१३ | ७,६४,७३,५५१ |

संदर्भ - वार्षिक अहवाल



**निष्कर्ष-**

**वरील आकृतीनुसार-**

१. संस्थेचे सन २०१७ ची ही एकूण ठेव ६,८७,६२,०९९ ऐवढी आहे.

२. संस्थेचे सन २०१७च्या तुलनेत २०१८ ची ठेव ३.४७% वाढ झाली आहे.

३. संस्थेच्या सन २०१७ च्या तुलनेत २०१८ मध्ये बचत खात्यात घट झाली आहे.


कु-हाट मनिषा पोपटराव

**४.५ कर्ज आणि ॲग्रीमेंट -**

**तक्ता क्रं.- ४.५**

**कर्ज आणि ॲग्रीमेंट -**

| वर्ष | एकूण कर्जे रु. | वाढ/घट |
|---|---:|---|
| २०१६-१७ | ५,१६,७६,६४७ | मागील वर्षाच्या तुलनेत वाढ |
| २०१७-१८ | ४,८७,२७,९९३ | मागील वर्षाच्या तुलनेत घट |



**निष्कर्ष-**

वरील आकृतीप्रमाणे-

१. संस्थेने सभासदांना सन २०१७ या वर्षी ५,१६,७६,६४७ रुपयांचे कर्ज वाटप केले होते.

२ संस्थेने सभासदांना सन २०१८ या वर्षात ४,८७,२७,९९३ ऐवढे कर्जाचे वितरण केले होते.

३.संस्थेच्या दोन्ही वर्षामध्ये सन २०१८ मध्ये कर्जाचे वाटप कमी प्रमाणात झाले होते. याचे कारण म्हणजे अहवालात दिले आहे त्याप्रमाणे की, मागील वर्षाच्या कर्जाची थकबाकी जमा न झाल्याने संस्थेला कर्ज देण्यासाठी मोठ्या प्रमाणात व्याप वाढला होता.

४. ३१/०३/२०१८ अखेर थकबाकी रु. ६६,
३५,३०० इतकी असुन येणे कर्जाशी शेकडा प्रमाण १३.६१% आहे.

कुऱ्हाट मनिषा पांडुरंग


## ४.६ अल्पकालीन कर्ज व दिर्घकालीन कर्ज

**तक्ता क्रं- ४.६**

अल्पकालीन कर्ज व दिर्घकालीन कर्ज

| अ.क्रं. | वर्ष | एकुण कर्ज | | एकूण कर्जातील अल्पकालीन व दिर्घकालीन कर्जाचा हिस्सा टक्के | |
|---|---|---|---|---|---|
| | | अल्पकालीन | दिर्घकालीन | | |
| १. | २०१६-१७ | ८,३२,१५० | २,६०,८९,६१९ | १.४६% | ५३% |
| २. | २०१७-१८ | ९,८८,८१० | ३,१३,४३,२९६ | २% | ६२% |

(संदर्भ - वार्षिक अहवाल)




**निष्कर्ष -**

**वरील आलेखानुसार-**

**१.** संस्थेच्या सन २०१७ च्या आर्थिक वर्षात अल्पकालीन कर्ज हे एकूण कर्जाच्या १.४६ टक्के म्हणजे ८,३२,१५० होते. तर चालु मागील वर्षात हे कर्ज सुमारे ९,८८,८१० रु. इतके होते. ते एकुण कर्जाच्या सुमारे २% इतके आहे


**२.** संस्थेचे सन २०१७ च्या आर्थिक वर्षात दिर्घकालीन कर्ज हे एकूण कर्जाच्या ५३% होते, तर मागील वर्षात म्हणजे २०१८ मध्ये हे वाढून ते ६२% पर्यंत पोहचले आहे.

**४.७ व्याज दर**

**तक्ता क्रं. ४.७**

**व्याजदर दर्शविणारा तक्ता -**

| अ.क्रं. | ठेवी | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|
| १. | अल्पकालीन ठेवी | ७% | ७.२५% |
| २. | मध्यमकालीन ठेवी | ८% | ८.५०% |
| ३. | दिर्घकालीन ठेवी | ९% | ११.५०% |



**निष्कर्ष -**

वरिल आकृतीवरुन -

१. संस्थेच्या सन २०१६-१७ मध्ये अल्पकालीन मुदतीच्या कर्जासाठी ठरवून दिलेल्या व्याजाचे दर हे ७ टक्के द.सा.द.शे इतका आहे.

२. संस्थेच्या अल्पकालीन ३ महिन्यापर्यंतचा कालावधीच्या कर्जासाठी व्याज दर हे सन २०१६-१७ च्या तुलनेत सन २०१७-१८ चे व्याजदर हे शेकडा प्रमाण ७.२५ टक्के द.सा.द.शे. ने वाढ झालेली दिसून येते.

३. संस्थेच्या वाटप केलेल्या मध्यम मुदतीचे कर्ज १ वर्ष ते ५ वर्षापर्यंत चे व्याज दर हे २०१६-१७ व २०१८ चे शेकडा प्रमाण ८.५० टक्के द.सा.द.शे. इतके म्हणजेच मागील तीन वर्षाच्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये दिर्घकालीन ठेवीवर व्याजदर मोठ्या प्रमाणात वाढ झ ालेली दिसते.

कुऱ्हाट मनिषा पांडुरंग

## प्रकरण पाचवे

## सारांश निष्कर्ष व उपाययोजना

### ५.१ सारांश ः

सहकार म्हणजे एकमेकांस मदत करणे होय. सहकाराची एकी किंवा ऐक्य असा अर्थ लावला जातो. सहकार ही एक संघटना म्हणुन ओळखली जाते. ही एक कामाची व्यवस्थित पध्दत आहे.

सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या संस्था मोठमोठ्या उद्योग सहाकराची भावना प्रस्थापित होते. अनेक फायदे व मोठ्या प्रमाणावर नफा हा सहकारी संस्थामार्फत होत असतो. आज जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर सहकारी निर्मिती झाली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संशोधनासाठी मी राहुरी तालुक्यातील परिसरातील शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना भांडवल पुरवठा करणारी शनीसमर्थ बिगरशेती ग्रामीण पतसंस्था मर्यादित, मुळा कारखाना, सोनई या संस्थेचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा अभ्यास संशोधनाचा विषय निवडला आहे.

## ५.२ निष्कर्ष

श्री शनिसमर्थ ग्रामीण बिगरशेती पतसंस्था मर्यादित पतसंस्थेचा अभ्यास करताना हे ही लक्षात आहे की, पतसंस्थेने बिगरशेती व्यवसायासाठी सर्वाधिक कर्जपुरवठा केलेला आहे. वसुलीही बऱ्यापैकी झालेली आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे चालू वर्षी वसूली पाहिजे तितक्या प्रमाणात झालेली नाही. चालू वर्षात कर्जाची रक्कम ४ कोटी ८७ लाख २७ हजार ९९३ एवढी असून दुष्काळामुळे सन २०१७-१८ वर्षाअखेर ६६ लाख ३५ हजार ३०० एवढी थकबाकी आहे.

## ५.३ संस्थेची प्रगती -

**१.** सन २०१५-१६ साली श्रीशनिसमर्थ ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. या संस्थेची सभासद संख्या ३५० इतकी होती परंतू २०१७-१८ या चालू वर्षात ४०० झाली आहे.

२. संस्थेच्या भागभांडवलात मागील वर्षापेक्षा वाढ झालेली दिसून येते. २०१६-१७ सालापर्यंत संस्थेचे भागभांडवल १७ लाख २० हजार ५०० एवढे असून गतवर्षीपेक्षा त्यात १ लाख १८ हजार ८०० इतकी वाढ झाली आहे.

३. संस्थेने सभासदांना दिलेले कर्ज हे मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी दिलेल्या कर्जाचे प्रमाण दिसून येते.

४. संस्थेचा होणारा दरवर्षीचा नफा वाढत्या स्वरुपाचा असून मागील वर्षाच्या तुलनेत १३% ने वाढ झालेली दिसून येते.

कु. ... 

## ५.४ सुचना व उपाययोजना-

श्री शनिसमर्थ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, या संस्थेच्या व संस्थेच्या सभासद वर्ग यांच्या प्रगतीत वाढ घडवून आणण्यासाठी खालील उपाययोजना सुचवलेली आहे.

१. संस्थेच्या दृष्टीने सभासद संख्येत वाढ होण्यासाठी नवीन सभासदांच्याही फायदे व सेवा सुविधात वाढ करणे.

२. संस्थेने आपल्या शेतकरी व्यापारी व्यावसायीक सभासदांना मोठ्या प्रमाणावर कर्जे वाटप करावी.

३. संस्थेने सभासदांना दिलेले कर्जावरील व्याज हे द.सा.द.शे. १२ टक्के करावे.

४. संस्थेने सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या अटी व नियम शिथिल करावे.

५. संस्थेला आपले व्यवस्थापन सल्लागार म्हणून एखाद्या तज्ञ व्यक्तीची नेमणुक करावी.

६. संस्थेच्या ठेवीमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी संस्थेने ठेवी वरील व्याज दर हे जास्त द्यावेत.

**५.५ संदर्भ ग्रंथ-**


१. संस्थेचे अहवाल कालावधी

२. सहकार तत्त्वे आणि व्यवहार सहकार- श्री. अहिरराव जितेंद्र, श्री. सदाशिव मुळे

३. सहकारी संस्था व त्यांचे प्रवर्तन- श्री .. तापकिर मुकुंद, श्री. साबळे आर. जे. निराली प्रकाशन पुणे, ( आवृत्ती जून २०१० )

४. सहकार व अन्य व्यावसायिक संघटना- श्री. महेश कुलकर्णी

भारतीय बँक प्रणाली ( निराली प्रकाशन पुणे )


कुऱ्हाट मनिषा पोपटराव

**५.६ प्रश्नावली -**

१. पतसंस्थेचे पुर्ण नाव काय ?

२. पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता सांगा?

३. पतसंस्था स्थापना वर्ष सांगा?

४. पतसंस्थेची नोंदणी तारीख सांगा?

५. पतसंस्थेचे कार्यक्षेत्र सांगा?

६. पतसंस्थेचे सुरुवातीचे भाग-भांडवल सांगा?

७. पतसंस्थेच्या नियमित व नाममात्र सभासद संख्या किती?

८. पतसंस्थेतील ठेवीचे प्रकार सांगा?

९. ठेवीवरील व्याजदर सांगा?

१०. पतसंस्थेने या वर्षी किती कर्जवाटप केले ?

११. कर्जावरील व्याजदर सांगा?

१२. कर्जवितरण पध्दती कशी आहे?

१३. कर्जासाठी तारण म्हणून काय घेतले जाते?

१४. कर्जवाटप करताना कोणकोणत्या क्षेत्रांना प्राधान्यक्रम दिला जातो?

१५. कर्जवसुलीची पध्दती कशी आहे?

१६. एका व्यक्तीस पतसंस्था साधारण किती कर्ज देऊ शकते?

१७. पतसंस्थेच्या उत्पन्नाचे मार्ग काय?

१८. पतसंस्थेच्या गुंतवणुका सांगा व गुंतवणुक रक्कम किती?

१९. पतसंस्थेचे एकूण कर्मचारी किती?

२०. पतसंस्थेचा सन २०१६-१७ नफा किती?